# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी १८.००)
# शुक्रवार दिनांक ०८ मे २०२६

## ठळक बातम्या

1. **एल निनोच्या संभाव्य परिणामांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश.**
2. **राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या नोंदणीकृत सदस्याची संख्या मार्चमध्ये १७ लाखांवर.**
3. **राज्य शिक्षण मंडळाने घेतलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर, नागपूर विभागाचा निकाल ८९ पूर्णांक ७ शतांश टक्के.**
4. **नागपुरात ३१ मे ते ७ जून दरम्यान खासदार क्रीडा महोत्सव.**

## आता सविस्तर बातम्या .......

जलयुक्त शिवार

एल निनोच्या संभाव्य परिणामांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील जलसंधारण आणि जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गतची कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुंबईतील 'वर्षा' निवासस्थानी मृद व जलसंधारण विभागाच्या आढावा बैठकीत त्यांनी भूजल पातळी खालावलेल्या भागांना प्राधान्य देण्यास सांगितले. जलयुक्त शिवार २.० अंतर्गत मंजूर झालेल्या १ लाख ४४ हजारांहून अधिक कामांपैकी १ लाख १० हजार कामे पूर्ण झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. गाळमुक्त धरण अभियानांतर्गत ४७७.७३ लाख घनमीटर गाळ काढण्यात आल्याने मोठ्या प्रमाणात पाणीसाठा पुनर्स्थापित झाला आहे. विदर्भातील मालगुजारी तलावांची दुरुस्ती जूनपूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत २२ हजार कामे पूर्ण झाली असून ५७ अमृत सरोवरांची निर्मिती सुरू असल्याचेही बैठकीत सांगण्यात आले.

९० व्या स्थापना दिन

आकाशवाणीच्या ९० व्या स्थापना दिनानिमित्त आज दिल्लीसह विविध शहरांमध्ये मॅरेथॉनचं आयोजन करण्यात आलं. आकाशवाणी, दूरदर्शन आणि प्रसार भारतीचे कर्मचारी या मॅराथॉनमध्ये सहभागी झाले होते. दिल्ली इथं प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी आणि आकाशवाणीचे महासंचालक राजीव कुमार जैन यांची उपस्थिती होती. आकाशवाणीला ९० वर्षे पूर्ण झाली, त्यानिमित्त विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात येत असल्याचं गौरव द्विवेदी यांनी सांगितलं.

जागतिक अर्थव्यवस्था

जागतिक अर्थव्यवस्थेच्या स्थैर्यात भारत एका भक्कम आधारस्तंभासारखी भूमिका बजावत असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. जयशंकर यांनी सुरीनाम मध्ये विविध क्षेत्रांतल्या प्रतिनिधींना संबोधित केलं, त्यावेळी ते बोलत होते. आंतरराष्ट्रीय समृद्धीत भारत महत्त्वाचं योगदान देत असल्याचंही ते म्हणाले. प्रगतीची संकल्पना ही सीमांपलीकडे गेली पाहिजे, त्याला अनुसरूनच भारताची औद्योगिक आणि आर्थिक प्रगती केवळ देशापुरती मर्यादित नसून ती जागतिक स्थैर्याचं एक महत्वाचं साधन आहे असं ते म्हणाले.

निवृत्तीवेतन योजना

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना, NPS च्या लाभधारकांची संख्या मार्च महिन्यात २ कोटी १७ लाखांवर पोहोचली आहे. पेन्शन फंड नियामक आणि विकास प्राधिकरणाच्या नियमनाखालील या योजनेत सुमारे १६ लाख कोटी रुपयांपर्यंत ठेवी पोहोचल्या आहेत. अटल पेन्शन योजनेचेही ८ कोटी ९६ लाखांहून अधिक लाभार्थी आहेत. मे २०१५ मध्ये सुरू झालेल्या या योजनेचा उद्देश असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा व्यवस्था निर्माण करणे हा आहे.

एम्स नागपूर

एम्स नागपूर इथं आयसीडी-१० मृत्यू नोंद कोडिंगविषयक चार दिवसीय राज्यस्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमाला सुरुवात झाली आहे. ५ ते ८ मेदरम्यान आयोजित या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र शासनाच्या स्टेट ब्युरो ऑफ हेल्थ इंटेलिजन्स अँड

व्हायटल स्टॅटिस्टिक्स, Tata Memorial Centre आणि एआयआयएमएस नागपूरच्या फॉरेन्सिक मेडिसिन विभागाच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. उद्घाटनप्रसंगी एआयआयएमएस नागपूरचे कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी यांनी मृत्यू कारण नोंदणी प्रणाली अधिक सक्षम करण्यासाठी अशा प्रशिक्षणांची गरज अधोरेखित केली.या प्रशिक्षणात आयसीडी-१० कोडिंग, एमसीसीडी पद्धती, कायदेशीर चौकट आणि डिजिटल सराव सत्रांचा समावेश आहे.

रोजगार मेळा

अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी इथं १२ मे रोजी पं.दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा मेळावा होणार आहे. दोन नामांकित कंपन्यांमधील ५० पदांसाठी आयटीआय, पदविका आणि पदवीधर उमेदवारांची भरती केली जाणार आहे. इच्छुक उमेदवारांनी महा-स्वयंम पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करून आवश्यक कागदपत्रांसह मुलाखतीस उपस्थित राहावे, असे आवाहन सहायक आयुक्त प्रफुल्ल शेळके यांनी केले आहे.

मोफत कर्करोग तपासणी

पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या आरोग्याची काळजी घेत कर्करोगाविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने The Cancer Care Foundation आणि Journalist Club of Nagpur यांच्या संयुक्त विद्यमाने १० मे रोजी मोफत कर्करोग तपासणी आणि आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर नागपूर प्रेस क्लब, सिव्हिल लाइन्स येथे सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत पार पडणार आहे. या शिबिरामध्ये  कर्करोग, स्तनाचा कर्करोग, फुफ्फुसांचा कर्करोग आणि अंडाशयाच्या कर्करोगाची मोफत तपासणी करण्यात येणार आहे. या शिबिराचे मुख्य संरक्षक प्रदीप कुमार मैत्र तसेच समन्वयक अब्दुल गफूर पाशा यांनी पत्रकार परिषदेत शिबिराची माहिती दिली.

दहावी निकाल

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारीत घेतलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. राज्यात यावेळी एकूण ९२ पूर्णांक ९ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. राज्यातून या परीक्षेसाठी एकूण १५ लाख ५५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती, त्यापैकी १४ लाख २० हजार ४८६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यंदाच्या निकालात १७९ विद्यार्थ्यांनी पैकीच्या पैकी गुण मिळवले आहेत, यात सर्वाधिक १०४ विद्यार्थी लातूर विभागातले आहेत. कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक ९७ पूर्णांक ६२ शतांश टक्के लागला तर कोल्हापूर विभाग ९५ पूर्णांक ४७ शतांश टक्क्यांसह दुसऱ्या स्थानावर आहे. मुंबई ९४ पूर्णांक ९७ शतांश टक्के, पुणे - ९४ पूर्णांक २४ शतांश टक्के, नागपूर- ८९ पूर्णांक ७ शतांश टक्के आणि अमरावती - साडेनव्वद टक्के दहावीच्या निकालात यंदाही मुलींनी बाजी मारली असून ९४ पूर्णांक ९६ शतांश टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत, तर उत्तीर्ण मुलांची टक्केवारी ८९ पूर्णांक ५६ शतांश आहे. यंदा १७९ विद्यार्थ्यांनी पैकीच्या पैकी गुण मिळवून विशेष यश संपादन केलं आहे. त्यामध्ये सर्वाधिक १०४ विद्यार्थी लातूर विभागातील आहेत. विद्यार्थ्यांना गुण पडताळणीसाठी उद्यापासून येत्या २३ मे पर्यंत ऑनलाईन अर्ज करता येणार आहे.

खासदार क्रीडा

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या “खासदार क्रीडा महोत्सवा”चे आयोजन ३१ मे ते ७ जून २०२६ दरम्यान नागपूर शहरात करण्यात आले आहे. देशातील पहिला जमिनी स्तरावरील बहू-विध- प्रकारच्या क्रीडा उपक्रम म्हणून या महोत्सवाकडे पाहिले जाते. यंदा स्पर्धा केवळ नागपूर शहरातील स्थानिक खेळाडूंसाठी मर्यादित ठेवण्यात आल्या आहेत. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर सर्व मैदानी स्पर्धा रात्री फ्लड लाईट्समध्ये खेळवण्याचा निर्णय आयोजकांनी घेतला असून, काही स्पर्धा सकाळच्या वेळेत होणार आहेत.

आयपीएल टी-ट्वेंटी

आयपीएल टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्सचा सामना कोलकाता नाईट रायडर्स सोबत होणार आहे. दिल्लीतल्या अरुण जेटली स्टेडिअमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल. दरम्यान स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात लखनऊ सूपर जाएंट्सनं रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुवर ९ धावांनी विजय मिळवला.

हवामान

विदर्भाच्या अनेक जिल्ह्यांमध्ये आज, उद्या आणि परवा वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट तर काही ठिकाणी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. अमरावती, बुलढाणा, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये आज ऑरेंज अलर्ट असून अकोला, वाशिम, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये येलो जारी करण्यात आला आहे. यादरम्यान मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने व्यक्त केली असून आज सर्वाधिक कमाल तापमान वाशिम जिल्ह्यात 42. 2 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं तर नागपुरात आज 39. 4 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे

अपघात

गडचिरोली जिल्ह्यातील आलापल्ली-भामरागड मार्गावरील तलवाडा गावाजवळ ट्रॅक्टरच्या धडकेत दुचाकीवरील दाम्पत्य ठार झाले, तर एक युवक गंभीर जखमी झाला. गुरुवारी संध्याकाळी झालेल्या या अपघातात महाकापाडी येथील कुम्मा पुंगाटी आणि मिडको पुंगाटी यांचा मृत्यू झाला. परायणार येथील आशिष महाका हा युवक गंभीर जखमी असून त्याला चंद्रपूर येथे उपचारासाठी हलविण्यात आले आहे. अहेरी पोलिसांनी ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

महाराजस्व अभियान

चंद्रपूर तहसील कार्यालयाच्या वतीने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाची सुरवात जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी विविध स्टॉलची पाहणी करून केला. नागरिकांना एकाच ठिकाणी शासकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या

उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत आहे. चंद्रपूर तालुक्यातील हे पाचवे शिबिर असून यापूर्वीच्या शिबिरांनाही नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. यावेळी आमदार किशोर जोरगेवार  यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

अतिक्रमण नियमित

अमरावती महानगरपालिकेच्या हद्दीतील शासकीय जमिनीवरील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत असलेल्या निवासी अतिक्रमणांना नियमित करण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने पाऊल उचलले आहे. महानगरपालिका क्षेत्रातील मारुती नगर (पेठ अमरावती), सातुर्णा (जुने गावठाण) आणि महाजनपुरा या भागांतील एकूण 77 कच्चे बांधकाम असलेल्या घरकुलांचे मालकी हक्काचे पट्टे वाटप करण्याचा मार्ग आता मोकळा झाला असल्याचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जाहीर केले आहे. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून कच्च्या घरांमध्ये राहणाऱ्या गरीब कुटुंबांना स्वतःच्या हक्काचे घर आणि मालकी हक्क मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

*****